**MHKO160005702021**

नियमित दिवाणी दावा क्र. ७८/२०२१, निशानी क्र १४

०१. ति-हाईत इसम यांनी प्रस्तुतचा अर्ज, सोबतचे प्रतिज्ञापत्र दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा आदेश १ नियम १० अन्वये त्यांना आवश्यक पक्षकार म्हणून दाव्याचे कामी सामील करणेत यावे याकरीता दाखल केला आहे. ति-हाईत इसम यांचे असे कथन आहे की, त्यांना दगडू भाऊ कांबळे यांनी दि. १५/०१/१९९४ रोजी दत्तक घेतलेले आहे, तेव्हापासून ते दगडू कांबळे यांचे दत्तकपुत्र आहेत. ति-हाईत इसम हे स्वतः वडील दगडू कांबळे यांचे मृत्यूनंतर त्यांची वडिलार्जित मिळकत पाहात आहेत. ति-हाईत इसम यांचेबाबतची वर नमूद घटना वादी यांना माहित असूनदेखिल, वादी यांनी ति-हाईत इसमांना दाव्याचे कामी पक्षकार म्हणून सामील केलेले नाही. ति-हाईत इसम हे दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार आहेत कारण दाव्या मिळकतीमध्ये त्यांचे हक्क संबंध आहेत. सबब, वर नमूद कारणांवरून ति-हाईत इसम यांनी अर्ज मंजूर करण्यात यावा आणि दाव्याचे कामी त्यांना आवश्यक पक्षकार म्हणून सामील करण्यात यावे अशी विनंती केली आहे.

०२. वादी यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले आहे. वादी यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये ति-हाईत इसम यांचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही, ति-हाईत इसम यांचे लाभामध्ये दत्तक पुत्राचा दस्त झालेला नाही, त्यामुळे ति-हाईत इसम दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार नाहीत, त्यामुळे वादी यांनी अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

०३. मी ति-हाईत इसम, वादी यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अभिलेखावरील कागदपत्रे, वादी यांचे वादकथन यांचे अवलोकन केले आहे.

०४. ति-हाईत इसम यांनी आजरोजी दि. १५/०१/१९९४ रोजीच्या दत्तक पत्राची प्रत दाखल केली आहे. दि. १५/०१/१९९४ रोजीच्या दत्तक पत्राचे

अवलोकन केले असता ति-हाईत इसम यांना दगडू कांबळे यांनी दत्तक घेतले आहे ही घटना अभिलेखावर येत आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा, दावा मिळकतीमध्ये वाटप होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे आणि ते मयत दगडू भाऊ कांबळे यांचे वारस आहेत असे कथन केले आहे. वर नमूद घटनांवरून ति-हाईत इसम हे दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार असल्याचे स्पष्ट होत आहे, त्यामुळे त्यांना दाव्याचे कामी पक्षकार म्हणून सामील करणे अत्यंत गरजेचे आहे. सबब, वर नमूद निष्कर्षास अनुसरून मी खालील आदेश करीत आहे.

## आदेश

०१ अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२ वादी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी प्रस्तुत आदेशापासून चौदा दिवसांचे आत ति-हाईत इसम यांना दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार म्हणजे प्रतिवादी म्हणून सामील करावे आणि दुरूस्त वादपत्राची प्रत दाखल करावी.

सही/-

दिनांक ०८/१०/२०२१

( एच आर पाटील )
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
मलकापूर-शाहूवाडी